# मेट्रो-३ आता नेव्ही नगरपर्यंत!

## सल्लागार समिती नेमणार

अतिक शेख/मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ ही मेट्रो-३ मार्गिका नेव्ही नगरपर्यंत नेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. एमएमआरसीने या प्रकल्पाच्या तपशीलवार अहवालासाठी सल्लागार समिती नेमण्याचे ठरवले आहे. भारतीय नौदल व मेट्रो प्रतिनिधींची या विषयावर सर्वंकष चर्चा झाली आहे.

सूत्रांनी सांगितले की, कुलाबा-सीप्झ हा मेट्रो मार्ग नेव्ही नगरपर्यंत विस्तारीत करणे शक्य आहे.

➧ संमिश्र पानावर

# मेट्रो-३ आता नेव्ही नगरपर्यंत !

(पान १ वरुन) या विस्ताराच्या अभ्यासासाठी आणखी सहा महिने लागतील. २०२३ च्या मध्यावर निविदा जारी केल्या जातील. हा मार्ग २.५ किमीचा असेल. विस्तृत तपशीलवार अहवालासोबतच सामाजिक व पर्यावरण अहवाल तयार केला जाईल. या प्रकल्पाच्या बांधणीबाबत एमएमआरसीचे अधिकारी व नौदल अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली. यात दीड किमीचा मार्ग हा प्रवाशांसाठी असेल तर १ किमी मार्ग हा ट्रेन उभा करण्यासाठी व मार्ग बदलासाठी ठेवला जाईल.

नेव्ही नगर हा अतिसंवेदनशील विभाग आहे. येथे प्रकल्प राबवताना प्रत्येक सुरक्षेच्या बाबी लक्षात घ्यावा लागतील. यासाठी केंद्रीय संरक्षण खात्याने दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. तसेच पायाभूत सुविधा उभारताना तिसऱ्या पक्षाला काम करताना बारीक लक्ष ठेवावे लागेल.

गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारने चीनी कंपन्यांना कंत्राटे देणे बंद केले आहे. तसेच चीनी सुटे भाग एखाद्या प्रकल्पात घेतले जात नाहीत. तसेच या कामासाठी भरती करताना प्रत्येक व्यक्तीची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागेल. त्यानंतरच त्याला कामावर नेमावे लागेल.

## अर्थसंकल्पातच घोषणा

भुयारी मेट्रो झाल्यास नेव्ही नगर येथील दळणवळण सुधारेल. संरक्षण खात्याने याबाबत एमएमआरसीशी संपर्क साधला होता. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात या विस्ताराची घोषणा केली होती.